http://www.epitomejournals.com, Vol. 4, Issue 1, January 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सक्षमीकरण विषयक दृष्टिकोन आणि त्यांच्या विचारांचा स्त्री समाजावर होणारा परिणाम





**संशोधक विद्यार्थीनी**

**वैशाली भाऊराव ठिल्लार (मोरे)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

**मार्गदर्शक**

**डॉ. प्राचार्य राजकुमार मस्के**

सामाज कार्य महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना :**

ज्या समाजामध्ये स्त्री मानाचे व सन्मानाचे स्थान मिळणे आवश्यक होते. अशा या स्त्री घटकाला प्रत्येक क्षणीनिंदा नालस्ती, अपमान, हत्याचार, अन्याय हया सारख्या ल्यांच्छास्पद बाबीचा सतत सामना करावा लागतो. पृथ्वीतलावर स्त्रीला आपण मातेचा दर्जा दिला. जिचा उच्चार करताच मान ही अभिमानाने उंचावते अशी ही माता अश हया स्त्री घटकाची सक्षमीकरण हा चिंतनाचा विषय झाला आहे. व त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा स्त्री सक्षमीकरण विषयक दृष्टीकोन आणि त्यांच्या विचारांचा स्त्री समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे महत्वाचे वाटते.

 *All rights reserved.*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांमधील अज्ञानअंधश्रध्दा दूर करण्यासाठी व त्यांच्यात जाणीव जागृती निमार्ण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे योगदान महान आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे विचार जाणून घेणे महत्त्वाचे वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्ती चळवळीचा पुरस्कार केला. स्त्रीच्या आत्मसन्मानासाठी शिक्षणाची आवश्यकता होती. शिक्षीत स्त्री प्राथमिक पातळीवर आपल्या कुटुंबाचे आणि नंतर समाजाच्या मुक्तीचे भान ठेवेल असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता. महाडच्या सत्याग्रही ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषासाठीच नाही. त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहे. पुढील पीढी सुधारण्यासाठी मुलीनांही शिक्षण दिल्या शिवाय राहु नका.  अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाला अग्रक्रम देवून ज्ञानार्जना पासुन कोणी ही वंचीत राहु नये यासाठी प्रयत्न केले, शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे व भौतिक परिवर्तनाचे साधन असल्याचे दलीत स्त्री पुरुषांना शिक्षणाची कासधरावयास सांगितले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुला-मुलीच्या एकत्र शिक्षणाचा पुरस्कार करुन मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय व औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय स्थापन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन मनूस्मृतीचे चिकित्सक विश्लेषेन केले. स्त्रीयावर गुलामगिरीचे जिवन लादण्याचा स्त्रीयांचे हक्क हिरावनू घेणाऱ्या त्यांचे शोषण करणाऱ्या या मतूस्मृतीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दहन केले. आणि स्त्री पुरुष समानतेचा स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. भारताला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरात राज्य घटनेद्वार स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा विचार करुन पुरुषाप्रमाणे स्त्रीयांना अधिकार दिले. या अधिकारावर गदा येऊ नये म्हणुन २१ ऑगस्ट १९४८ हिंदु कोड बिल मांडले. यात आंतरजातीय विवाहास मान्यता एक पत्नी तत्त्वाचे बंधन, पुरुषा प्रमाणेच स्त्रीया सुध्दा घटस्फोट मागण्याचा अधिकार मुला इतकाच मुलीला सुध्दा वडीलांच्या मालमत्तेत अधिकार इ. बाबींचा समावेश होता. या बिलाद्वारे स्वातंत्र्योत्तर कालात स्त्रीयांच्या अधिकाराचे कायदयात्मक दृष्टीकोनातून जतन, संवर्धन करणारे कार्य केले गेले. पुरुषप्रधान समाजातील स्त्रीदास्य याद्वारे संपणार होते. म्हणुन

    All rights reserved.

आंबेडकर म्हणतात मी भारतीय राज्य घटना निर्माण केली त्यापेक्षाही हिंदुकोड बिल माझ्या हातुन तयार झाले याचा आनंद होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य भारतात राज्य घटना तयार केली व त्यातही स्वातंत्र्य समता बधूता या त्रियुक्तीवर आधारित समाज निर्मितीसाठी स्त्रीयांच्या हक्कांचे संरक्षण करुन पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार बहात केले. महिला सक्षमीकरण ही आजच्या कालातील एक महत्वाची बाब आहे. या सक्षमीकरणात प्रामुख्याने स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती, स्त्री मुक्ती चळवळ, स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीयांचे हक्क व कर्तव्ये, अधिकार भारतीय राज्य घटना म्हणजेच कायदा अशा विविध संकल्पनाचा समावेश होतो. प्राचीण कालापासुन ही स्त्री विविध जातीच्या, रुढीच्या बंधनात अडकलेली होती.

हया सामाजिक बंधनातून स्त्रीया मुक्त करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरण संकल्पना ही सन १९७५ साली मॅक्सीको येथे पहिली जागतिक परिषद घेण्यात आली. व त्या जागतिक कार्यक्रम स्विकारला गेला. दुसरी जागतिक परिषद १९८० मध्ये घेण्यात आली. या मध्ये महिलांसाठी काही धोरणे निश्चित करण्यात आले. सन १९८५ साली नैरोबी येथील जागतिक महिला परिषदेमध्ये ही संकल्पना उदयास आली. सक्षमीकरण म्हणजे समाज व्यवस्थेच्या प्रक्रियेत जे बाजुला फेकले गेले किंवा ज्यांच्यावर गुलामगिरी लादलीr गेली. त्या सगळया वंचितांना आपले मानवी हक्क मिळवून देण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय. तसेच सामाजिक सत्ता किंवा अधिकार संशोधनावरील नियंत्रण यांचे स्त्रियांना हक्क प्रदान करणे होय.

स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीयांचे कल्याण आर्थिक सामाजिक, राजकीय सांस्कृतिक दुष्टीने त्यांचा विकास त्या स्वतः करणे किंवा सक्षम सबल होणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय. स्त्रीयांना पुरुषा बरोबर समान संधी स्थान प्रतिष्ठा दर्जा मिळवून देण्यासाठी महिला सक्षमीकरण होणे आवश्यक आहे.

**संशोधन समस्येची गरज :-**

आज स्त्रिया कोणत्याच क्षेत्रात पुरुषापेक्षा कमी नाहीत हे सिध्द करण्यासाठी त्या प्रयत्नशिल आहेत. परंतु, पुरुषी अहंकारामुळे त्या पुरुषांवर अवलंबून राहतात. ग्रामीण भागातील स्त्रीया सुशिक्षित, विविध

 All rights reserved.

कौशल्य असणाऱ्या कार्य, चिकाटी व प्रामाणिक असूनही त्या आर्थिक दुष्टया स्वावलंबी नाहीत. त्याच्या अंगी नेतृत्व कौशल्य असूनही त्या परिस्थितीमुळे मोठया प्रमाणात स्त्रीया पूढे येतांना दिसून येत नाहीत. महिलाचा सबलीकरणाचा एक पैलू आहे.

१९४७ च्या नंतर भारतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या रूपाने स्त्री समानता आणण्यासाठी कायदे केले आहेत. परंतु, तरीही आज आपणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सक्षमीकरण विषयक दूष्टीकोन आणि त्याच्या विचारांचा स्त्री समाजावर होणारा परिणाम हा विषय अभ्यासण्याची गरज आहे.

महिला सक्षमीकरण करतांना, निराक्षित, निराधार, परित्यक्तया विधवा, आर्थिक दृष्टया कमकुवत मागासवर्गीय घटकातील भूमिहीन, शेतमजूर, अशिक्षीत, परावलंबी अशा महिलांच्या विकासावर आधिक भर देता यावा महिलांना स्थानिक स्वराज्यामध्ये स्थान मिळावे, व्यापार उदयोगातील स्पर्धेत टिकून राहता यावे आणि स्वंयरोजगार करता यावे, या दृष्टीने त्यांचेसाठी आरक्षण ठेवणे त्यांना कौशल्यावर प्रशिक्षण देणे मार्गदर्शन करणे ही महिला सक्षमीकरणाची व संशोधन समस्येची गरज आहे.

**महिला सक्षमीकरणाची व्याख्या :**

१. जागतिक बँक, (ेंदrत्् ँaहव) च्या मते व्यक्तीला किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट या कृतीमध्ये आणि फल प्राप्तीमध्ये उतरविण्यासाठी क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय.

२. Sharma Mukuma:- महिला सक्षमीकरण म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी, स्त्रीच्या शरीर, मानव बुध्दीमध्ये स्वत्वाची जाणीव व स्वतः बदल जागरुकता निर्माण करणारी व त्यादुष्टीने स्वंय विकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय.

३. स्त्रीला समाजात समान संधी निर्माण करुन देणे व विकासाची समान संधी देणे महिलांना सर्वच क्षेत्रात समान संधी देऊन स्त्रिया स्वतःची जाणीव करुन देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

 All rights reserved.

४. स्त्रीयांचा मानसिक, शारिरीक, बौदधीक, सामाजिक, सांस्कुतिक, राजकीय, भावनिक, कौटुिंबक विकास म्हणजे सक्षमीकरण होय.

**उदिष्टये :-**

१. भारतीय संविधानातील महिला विषयक शोध घेणे.

२. महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरण विषयक राबविलेल्या विविध धोरणाचा आढावा घेणे.

३. महिला सबलीकरणाचे महत्व लक्षात घेणे.

४. स्त्रीवाद व महिला सबलीकरणची भूमिका समजून घेणे.

५. आंतरराष्ट्रीय पातळीवरील महिला सक्षमीकरणा विषयीचा धोरणाचा आढावा घेणे.

६. भारतील महिलांविषयक सामाजिक स्तराचा अभ्यास करणे.

७. स्त्रीयांच्या सामाजिक जिवनात येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेस अंतर्भुत केलेल मूलभुत अधिकार मार्गदर्शक तत्वे, स्त्रीयाच्या उन्नतीकरण आरक्षणे अभ्यासणे.

**सारांश :**

महिला विकासाला महत्त्व किंवा प्राधान्य देण्याची गरज भासण्याचे प्रमुख कारण असे की, आत्तापर्यंत सर्वच समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या सर्वांगिण विकासाच्या मार्गात अनेक अडथळे उभे राहिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य भारतात राज्य घटना तयाार करून स्वातंत्र्य, समता, बंधूता या त्रियूक्तीवर आधारित समाज निर्मितीसाठी स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण करून पुरूषांच्या बरोबरीचे अधिकार बहाल केले व महिलांना सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान मिळवून दिले.

अशा प्रकारे महिला सबलीकरणामध्ये कायदा महत्त्वाची भूमिका बजावत आहे म्हणून आधुनिक महिलांनी जागरूक राहून याचा प्रसार करणे महत्त्वाचे आहे.

 *All rights reserved.*

# संदर्भ सूची

ऑम्व्हेट गेल, ज्योतीराव फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार, लोकवाड मय गृह प्रकाशन, मुंबई २००९ पृष्ठ क्रं.११

डॉ. बाबासाहेब – स्त्री मुक्ती – प्रा. प्रतिभा परदेशी

सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण डॉ. उज्वला वैरागडे / विदयुलता

सरोदे असीम – कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा मनोविकास प्रकाशन पुणे-२००७

डॉ. अशोक नाईकवाडे, महिला सबलीकरण – स्त्रीवादाची वाटचाल  प्रकाशित लेख २०११-१२

पुष्पा रेडे – भारतातील महिला विकासाची वाटचाल

भागवत कलम, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक, प्रकाशन पूणे -१९८५ पृ.२२

दै. लोकसत्ता : महिला सक्षमीकरण दिशा व दशा दिनांक ०८ मार्च २०१०

 All rights reserved.